International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# समाज माध्यम आणि मराठी भाषा

**डॉ. घोडके बापूसाहेब गोरख**

*मराठी विभाग, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (स्वायत्त) जि.सोलापूर.४१३३०४*

***Corresponding Author –*** ***डॉ. घोडके बापूसाहेब गोरख***

**DOI - 10.5281/zenodo.18654302**

**प्रस्तावना:**

आजच्या डिजिटल युगात समाज माध्यमे (Social Media) आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. सोशल मिडिया हे परस्परसंवादी तंत्रज्ञान व एक प्रकारचा आभासी समुदाय आहे. भाषा ही प्रवाही असते. ती काळानुसार बदलत जाते. मात्र गेल्या काही दशकात सोशल मीडियाच्या प्रसारामुळे भाषेच्या बदलाचा वेग वाढला आहे. माहिती तयार करणे, माहितीची देवाणघेवाण करणे, वापरकर्त्यांनी तयार केलेली सामुग्री मजकूर, पोस्ट, फोटो, व्हिडिओ जतन करणे व प्रसार करणे अशाप्रकारचे कार्य सोशल मिडियावर घडते असते. फेसबुक, फेसबुक मेसेंजर, ब्लॉग, वेचॅट, इंस्टाग्राम, ट्विटर, यूट्यूब, टेलिग्राम, व्हॉट्सॲप, व्हायबर ही सोशल मीडियामधील सर्वात लोकप्रिय माध्यमे आहेत. या सोशल मीडियामुळे गेल्या काही वर्षांत समाजात क्रांतिकारी बदल झाला आहे. समान हेतू असणारे लोक इंटरनेटच्या माध्यमातून आभासी पद्धतीने एकत्र येतात. मजकूर, पोस्ट, फोटो, व्हिडिओ अशा प्रकारच्या माहितीचे जतन व देवाणघेवाण करतात. अशा समूहाला सोशल मिडिया असे म्हणता येईल.

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. समाज माध्यमांच्या रूपाने गेल्या काही वर्षांमध्ये संवाद तंत्रज्ञानाचे एक नवे आणि मोठे अवकाश आपल्याला खुले झाले आहे. तिथल्या संवादाची एक शैली आणि पद्धत हळूहळू विकसित होत आहे. आता त्याचा प्रभाव जगातील व भारतातील विविध भाषांवर पडताना दिसत आहे. प्रत्येक भाषेगणिक, भाषिक समूहागणिक हा प्रभाव वेगवेगळा आहे. समाज माध्यमांमुळे भाषा अधिक वेगवान आणि प्रवाही झाली आहे. त्यामुळे भाषेची गुणवत्ता आणि शुद्धता टिकवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. समाजमाध्यमांमुळे मराठी भाषेचा वापर वाढला असून ती अधिक लोकांपर्यंत पोहोचत आहे. त्यामुळे भाषा समृद्ध होण्याबरोबर तिच्या मूळ स्वरूपावर परिणाम होत आहे. नवीन साहित्य निर्मिती,_माहितीचा प्रसार, सांस्कृतिक, वैचरिक देवाणघेवाणीसाठी समाजमाध्यमे महत्त्वाची ठरत आहेत. त्यामुळे भाषेचे जतन व संवर्धन करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न आवश्यक आहेत. पण त्याचबरोबर मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा मिसळून वापरणे, व्याकरण आणि शुद्धलेखनाच्या चुका होणे यांसारखे नकारात्मक परिणामही दिसून येतात. सोशल मिडियामुळे मराठीतील भाषिक व्यवहारावर त्याचे काय परिणाम दिसत आहेत हा विषय आपल्यासाठी महत्त्वाचा व संशोधनाचा आहे. समाज माध्यमांचा मराठी बोली भाषा, लिखित भाषा, प्रमाण भाषा व वाचनावर झालेला परिणाम अत्यंत व्यापक असून तो सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बाजूंनी दिसून येतो.

**समाज माध्यमांचा मराठी भाषेवर झालेला परिणाम:**

**१. समाज माध्यमांचा बोली भाषेवर होणारा परिणाम:**

मराठी ही एक समृद्ध भाषा आहे. त्याच बरोबर मराठीची प्रत्येक बोली भाषा ही संपन्न आहे. अहिराणी, मालवणी, वऱ्हाडी, नागपुरी, आगरी, कोकणी, मराठवाडी, उदगिरी, तावडी, सामवेदी, सातारी, कोल्हापुरी, बेळगावी अशी प्रत्येक बोली भाषा वैशिष्ट्यपूर्ण आहेत. बोलीभाषांमधील शब्द, म्हणी आणि वाक्प्रचार हे केवळ शब्दांचे समूह नसून ते त्या त्या प्रादेशिक लोकजीवनाचे, संस्कृतीचे आणि अनुभवांचे सार आहेत. आधुनिक काळात समाज माध्यमांच्या उदयामुळे संवादाची पारंपरिक पद्धत बदलली असून त्याचा थेट परिणाम या बोलीभाषांच्या स्वरूपावर होत आहे. पूर्वी बोलीभाषा विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात मर्यादित होत्या. आज समाज माध्यमांमुळे विविध बोलीतील आशय जगभरातील मराठी भाषकांपर्यंत पोहोचत आहे. यु ट्यूब आणि इंस्टाग्रामवर प्रादेशिक बोलींमध्ये रील आणि व्हिडिओ बनवणाऱ्या इन्फ्लुएन्सर्सची संख्या वाढली आहे. त्यांनी बोली भाषांना जागतिक ओळख दिली आहे. यामुळे नवीन पिढीला आपल्या मूळ बोलीभाषांचा अभिमान वाटू लागला आहे. त्यामुळे विस्मरणात गेलेले शब्द पुन्हा वापरात येत आहेत. अनेकदा लिखित स्वरूपात नसलेल्या प्रादेशिक बोलीभाषा उदा.अहिराणी, मालवणी सोशल मीडियावरील व्हिडिओंमुळे पुन्हा चर्चेत येत आहेत. सोशल मीडियामुळे 'लाईक करणे', 'शेअर करणे', 'ब्लॉक करणे', 'ट्रेंडिंग' यांसारखे नवीन नवीन शब्दांची निर्मिती व क्रियापद मराठी बोलीभाषेत रूढ झाले आहेत. बोली भाषांमधील म्हणी, वाक्प्रचार आणि लोककथा आता डिजिटल स्वरूपात जतन केल्या जात आहेत. जे भविष्यातील संशोधनासाठी उपयुक्त आहे. समाज माध्यमांनी मराठी भाषेला आधुनिक स्वरूप दिले. त्यामुळे भाषेची शुद्धता आणि गुणवत्ता टिकवून ठेवण्याचे आव्हान आजच्या पिढीसमोर आहे. योग्य मराठी कीबोर्डचा वापर करून आपण देवनागरी लिपीचे संवर्धन करू शकतो. समाज माध्यमांचा बोली भाषेवर पडणारा प्रभाव हा आजच्या भाषाशास्त्रीय अभ्यासातील एक महत्त्वाचा विषय आहे. बोलीभाषांचे संवर्धन करण्यासाठी त्यांचा वापर करताना मराठी भाषा विभागाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे. तंत्रज्ञानाचा वापर करून बोलींमधील शब्दकोश डिजिटल करणे ही काळाची गरज आहे.

मराठीच्या बोली भाषेवर समाज माध्यमांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात पडला आहे. “काय करतोयस?” ऐवजी “काय चालू आहे?” Party चं काय झालं?” अशी वाक्य सर्रास वापरली जातात. संवादात But, Actually, Anyway यांसारख्या इंग्रजी शब्दांचा वापर मराठी बोलीचा अविभाज्य भाग बनला आहे. संक्षिप्त शब्दांचा वापर वेळेची बचत आणि जलद संवादासाठी शब्दांचे संक्षिप्तीकरण केले जात आहे. उदा. “नमस्कार” ऐवजी Hi/Hey, “ठीक आहे’ ऐवजी Ok किंवा K, Please ऐवजी Plz, Congratulations ऐवजी Congrats. अनेकदा भावना व्यक्त करण्यासाठी शब्दांची गरजच उरलेली नाही. आनंद, राग, दुःख किंवा संमती दर्शवण्यासाठी केवळ इमोजी आणि स्टिकर्सचा प्रभावी वापर केला जात आहे. यामुळे प्रत्यक्ष शब्दसंग्रहाचा वापर कमी होत चालला आहे. सोशल मिडियामध्ये संवाद साधताना वेळेची बचत करण्यासाठी शब्दांचे शॉर्टकट वापरले जातात उदा. “आहे” ऐवजी “आहेस” किंवा “आहेत” ला फक्त “आहे” वापरणे. यामुळे भाषेची शैली व व्याकरण बिघडत आहे. अनेकदा मराठी लिहिताना इंग्रजी, हिंदी शब्दांचा अतिवापर केला जातो आहे. ज्यामुळे मूळ मराठी शब्द व शब्दाचा अर्थ मागे पडत आहेत. सोशल मीडियावर लिहिताना शुद्धलेखनाच्या नियमांकडे दुर्लक्ष केले जाते. ज्यामुळे नवीन पिढी चुकीचे शब्द शिकत आहे.

अनेकदा कमेंट बॉक्समध्ये वापरली जाणारी भाषा ही अत्यंत अनौपचारिक आणि कधीकधी असभ्य स्वरूपाची असते. ज्याचा भाषेच्या अभिव्यक्ती व दर्जावर परिणाम होतो. यामुळे बोली भाषेतील खास लकबी किंवा उच्चार पद्धती नष्ट होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

सोशल मीडियाने मराठी बोली भाषेला अधिक लवचिक आणि आधुनिक बनवले असले, तरी भाषेची गुणवत्ता, मूळ सौंदर्य आणि व्याकरण धोक्यात आले आहे. तंत्रज्ञानासोबत बदलणे गरजचे असले, तरी आपल्या भाषेचा मूळ आशय, अभिव्यक्ती व गुणवत्ता टिकवून ठेवणे ही काळाची गरज व आव्हान आहे. सोशल मीडियाचा वापर करताना भाषेचा मूळ आशय, अभिव्यक्ती व गुणवत्तेकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**२. समाज माध्यमांचा लिखित भाषेवर होणारा परिणाम:**

प्रत्येकाला व्यक्तीला आपले मत, विचार, भावना लिहिण्याचे किंवा मांडण्याचे स्वातंत्र्य समाज माध्यमावरती असते. या स्वातंत्र्यामुळे समाज फार मोठ्या प्रमाणावर समाजमाध्यमांकडे वळलेला आपल्याला पहावयास मिळतो. ही समाज माध्यमे लोक विचारांना, लोक भावनांना, राज्यघटनेतील अभिव्यक्ती स्वातंत्र्याला अनुसरून मार्गक्रमण करीत असल्याचे दिसून येत आहे. समाज माध्यमांवर मराठी लिपीचा लेखी वापर करण्यामध्येच सुरुवातीच्या काही वर्षांमध्ये बरेच अडथळे होते. समाज माध्यमांच्या सर्व व्यासपीठांवर सहज वापरता येईल असे मराठी कळफलक येण्याला व ते लोकांच्या अंगवळणी पडायला इतर भाषांच्या तुलनेत थोडा उशीरच झाला. मराठी लिपीसंबंधी तांत्रिक गुंते सुटल्यानंतर आणि मराठीत लिहिलेले चालते हे लक्षात आल्यानंतर समाज माध्यमांवर मराठीतील लिखाणाचा प्रवाह वाढू लागला. आज इंग्रजी, हिंदी, बांगला, तामिळ इतका नसला तरी समाज माध्यमांवरील मराठीचाही प्रवाह लक्षणीय वाढ होत आहे हे दिसून येते. मराठी भाषकांची डिजिटल व्यासपीठांवरील बाजारपेठ जसजशी मोठी होत जाईल तसतशी बाजारपेठेच्या तर्काला महत्त्व देणारी समाज माध्यमे मराठीलाही प्राधान्य देत जातील. नवे तांत्रिक शब्द: 'अपडेट', 'शेअर', 'ट्रेंड', 'अल्गोरिदम' यांसारखे शब्द मराठीच्या प्रमाण शब्दसंग्रहात इतके मिसळले आहेत की, त्यांचे मराठी पर्यायी शब्द उदा. अद्ययावत, सामायिक करणे कालबाह्य वाटू लागले आहेत.

समाज माध्यमांवर लिहिताना शुद्धलेखनाच्या नियमांकडे (उदा. ऱ्हस्व-दीर्घ, अनुस्वार) दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे भाषेचे मूळ सौंदर्य आणि शिस्त बिघडत असल्याचे चित्र दिसते. वेळेच्या अभावामुळे आणि वेगाने संवाद साधण्याच्या गरजेतून मराठी शब्दांचे संक्षिप्तीकरण झाले आहे. भावना व्यक्त करण्यासाठी शब्दांऐवजी 'इमोजी' आणि 'गिफ्स'चा वापर वाढला आहे. त्यामुळे लिखित शब्दांची जागा चित्रांनी घेतली. सोशल मीडियावरूनच 'मराठी शुद्धलेखन' शिकवणारे अनेक गट आणि पेजेस सक्रिय आहेत. ते प्रमाण भाषेच्या प्रसारासाठी काम करत आहेत. पूर्वी लिखित भाषा आणि बोलीभाषा यात स्पष्ट तफावत होती, परंतु आता सोशल मीडियावर 'लिखित बोलीभाषेचा' नवा प्रवाह सुरू होत आहे.

समाज माध्यमांमुळे कविता, लेख आणि कथा क्षणार्धात वाचकांपर्यंत पोहोचतात. यामुळे नवीन लेखकांना व्यासपीठ मिळाले असून वाचन संस्कृतीला एक वेगळे वळण मिळाले आहे. समाज माध्यमांमुळे मराठी भाषा अधिक 'लोकभिमुख' आणि 'वेगवान' झाली असली, तरी तिच्यातील गुणवत्ता आणि व्याकरणाचा दर्जा टिकवून ठेवणे हे मोठे आव्हान आहे. तंत्रज्ञानाचा वापर करताना आपली मूळ 'देवनागरी' लिपी आणि भाषेचे सौंदर्य जपणे ही

काळाची गरज आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने समाज माध्यमांवर भाषेचे जतन करण्याची मोठी संधी आहे. जर आपण जाणीवपूर्वक देवनागरी लेखनाचा आग्रह धरला तरच लिखित मराठी भाषेचे संवर्धन होईल.

**३. समाज माध्यमांचा प्रमाण भाषेवर होणारा परिणाम:**

प्रमाणभाषा ही एक बोली भाषाच असते. त्याचे नियम पक्के बांधलेले आणि मान्यताप्राप्त असतात. यामुळे सर्वत्र एकाच प्रकारचे लेखन केले जाते. त्यामुळे भाषा वाढीस त्याचा उपयोग होतो. कोणत्याही प्रगत समाजाच्या वैचारिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीसाठी 'प्रमाण भाषा' हा पाया असतो. मराठीत व्याकरणदृष्ट्या शुद्ध आणि संस्थात्मक पातळीवर स्वीकारलेल्या भाषेला आपण प्रमाण भाषा मानतो. सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे या प्रमाण भाषेचे स्वरूप वेगाने बदलताना दिसून येत आहे. लिखित संवादाच्या मर्यादा ओलांडून 'डिजिटल मराठी' ही एक नवी परिभाषा उदयाला येत आहे. सोशल मीडियामुळे मराठी प्रमाण भाषेच्या पारंपारिक चौकटी मोडल्या जात आहेत. भाषेचे हे 'सरलीकरण' संवादासाठी सोयीचे असले तरी, शैक्षणिक आणि साहित्यिक स्तरावर प्रमाण भाषेची गुणवत्ता राखणे हे मोठे आव्हान ठरत आहे. भविष्यात डिजिटल प्रमाण मराठी ही एक नवी स्वतंत्र शैली म्हणून मान्यता पावेल अशी चिन्हे दिसत आहेत. विविध डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे मराठीचा प्रसार आणि संवर्धनाचा आवाका वाढला आहे. अनेक नवोदित लेखक आणि कवी आपले साहित्य सोशल मीडियाच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचवत आहेत, ज्यामुळे मराठी साहित्याचा परीघ विस्तारत आहे.

बोलताना किंवा लिहिताना मराठी शब्दांऐवजी इंग्रजी शब्दांचा वापर वाढला आहे. ज्यामुळे मूळ मराठी शब्द मागे पडत आहेत. टाईपिंग करताना 'ऑटो-करेक्ट' वर अवलंबून राहिल्यामुळे शुद्धलेखनाच्या चुका वाढल्या आहेत. व्याकरणाकडे दुर्लक्ष केल्यामुळे भाषेचे शुद्ध स्वरूप धोक्यात आले आहे. समाज माध्यमांनी मराठी भाषांना ओळख मिळवून दिली असली तरी, मूळ व्याकरण आणि लिपी टिकवून ठेवणे हे एक मोठे आव्हान बनले आहे. पूर्वी तांत्रिक अडचणींमुळे मराठी लिहिण्यासाठी मर्यादा होत्या. आता प्रगत मराठी की बोर्ड्स आणि व्हॉइस टायपिंगमुळे देवनागरीत लिहिण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे ब्लॉग्स, गुगल आणि विकिपीडियासारख्या माध्यमांमुळे विविध विषयांवरील शास्त्रीय आणि तांत्रिक माहिती प्रमाण मराठी भाषेत लिखित स्वरूपात उपलब्ध होत आहे. प्रमाण भाषेत विरामचिन्हांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. सोशल मीडियावरील अनौपचारिक संवादात त्यांचा वापर जवळजवळ संपुष्टात आला आहे. त्याची जागा इमोजींनी घेतली आहे. सोशल मीडियामुळे मराठी, हिंदी, इंग्रजी मिश्रित भाषेचा वापर वाढला आहे.

**४. समाज माध्यमांचा वाचनावर होणारा परिणाम:**

वाचन संस्कृती ही समाजाच्या प्रगती व विकासासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. आजच्या युगात प्रगत तंत्रज्ञानामुळे वाचन संस्कृतीत मोठे बदल झाले आहेत. समाजातील विविध क्षेत्रांमध्ये या बदलाचे परिणाम दिसून येत आहेत. जसे स्वयंअध्ययन करू शकेल अशी शिक्षण प्रक्रीयेची साधने उदा. ई-लर्निंग विद्यार्थ्यांचे अध्ययन भिन्न-भिन्न ठिकाणी होणे शक्य आहे. घरी किवा कामाच्या ठिकाणीसुद्धा अध्ययन होऊ शकते. परस्परांशी इंटरनेटने जोडलेल्या अनेक शिक्षणसंस्थांचे किंवा समूहांचे जाळे यांच्यावर या माध्यमांचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव असतो. यामुळे आचार, विचार, प्रचार इत्यादी बाबींचा उपयोग आणखी जास्त होऊ शकतो. या दृक-श्राव्य माध्यमांमध्ये संगणक, इंटरनेट, स्मार्टफोन या बरोबरच व्हॉट्सअप,

फेसबुक, ई-बुक, ई-ग्रंथालय, ई-बैंकिंग, ई-मार्केटिंग, ई-लर्निंग, ई-ट्रेडिंग इ. माध्यमे प्रभावीपणे कार्यरत असलेली दिसतात. आज ई-बुक्स आणि पीडीएफमुळे दुर्मिळ पुस्तके मोबाईलवर उपलब्ध झाली आहेत. यामुळे मानवी विकास आणि प्रगतीकडे मोठ्या वेगाने वाटचाल होताना दिसत आहे. कालच्या काळात वाचन संस्कृती ही मुख्यतः पुस्तके, ग्रंथालये आणि हस्तलिखित साहित्यावर अवलंबून होती. लोकांनी ज्ञान मिळवण्यासाठी आणि मनोरंजनासाठी पुस्तकांचा उपयोग केला. त्या काळात वाचन हा एक सामाजिक आणि शैक्षणिक क्रिया मानली जात होती. ज्यामुळे व्यक्तीच्या विचारसरणीचा विकास होत होता.

डिजिटल माध्यमांचा वापर वाढला असून ई-बुक्स, ऑनलाइन लेख, ब्लॉग्स आणि सोशल मिडिया यामुळे वाचनाच्या स्वरूपात बदल झाले आहेत. लोकांना माहिती पटकन मिळते. त्याचबरोबर सततच्या तंत्रज्ञानाच्या व्यत्ययामुळे वाचनाची सखोलता कमी झाली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्था प्रयत्नशील आहेत. उद्याची वाचन संस्कृती कशी असेल याबाबत विचार करताना वाचन संस्कृतीवर तंत्रज्ञानाचा अधिक प्रभाव दिसून येते. आभासी वास्तव ऑडिओबुक्स आणि इतर नव्या माध्यमांमुळे वाचन अधिक सुलभ आणि आकर्षक होईल. तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे मानवी जीवनशैली पूर्णपणे बदलली आहे. विविध प्लॅटफॉर्म्सनी माहितीच्या देवाणघेवाणीचा वेग वाढवला आहे. त्याचा सर्वात मोठा परिणाम मानवाच्या वाचन सवयीवर झाला आहे. पूर्वीचे सखोल वाचन आता 'स्क्रोलिंग' आणि 'स्किमिंग' मध्ये रूपांतरित झाले आहे. समाज माध्यमांमुळे वाचनाचे स्वरूप 'मुद्रित' कडून 'डिजिटल' कडे सरकले आहे. पूर्वी लोक पुस्तके, वर्तमानपत्रे तासनतास वाचत असत. आता त्याचे स्थान मोबाईल स्क्रीनने घेतले आहे. लोक लांबच लांब लेखांऐवजी छोटे मेसेज, कॅप्शन्स आणि थ्रेड्स वाचण्याला पसंती देत आहेत. समाज माध्यमांच्या अतिवापरामुळे माणसाची एकाग्रता कमी होत आहे. वाचकाचा संयम कमी झाला आहे.

समाज माध्यमे माहितीच्या प्रसारासाठी ते उत्तम साधन आहेत, परंतु त्याने आपल्या सखोल वाचनाच्या सवयीवर परिणाम केला आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी डिजिटल वाचनासोबतच छापील पुस्तकांच्या वाचनाची सांगड घालणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा वापर केवळ माहिती मिळवण्यासाठी करावा. ज्ञानाच्या समृद्धीसाठी पुस्तके वाचन अपरिहार्य आहे.
मात्र या नव्या स्वरूपातही सखोल आणि चिंतनशील वाचनाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. वाचन संस्कृतीला टिकवण्यासाठी शैक्षणिक धोरणे आणि सामाजिक जागरूकता वाढवणे गरजेचे आहे. एकंदरीत वाचन संस्कृती ही कालापासून आजपर्यंत सतत बदलत आली आहे आणि उद्याही या बदलांना सामोरे जाईल. परंतु ज्ञानार्जन आणि व्यक्तिमत्व विकासासाठी वाचनाची महत्त्वपूर्ण भूमिका कायम राहील.

**निष्कर्ष:**

१. समाज माध्यमावर अनेकदा आनंद, राग, दुःख किंवा संमती दर्शवण्यासाठी केवळ 'इमोजी' आणि 'स्टिकर्स'चा प्रभावी वापर केला जात आहे. सोशल मिडियामध्ये संवाद साधताना वेळेची बचत करण्यासाठी शब्दांचे शॉर्टकट वापरले जातात. यामुळे भाषेची गुणवत्ता, शैली व व्याकरण धोक्यात आले आहे.

२. तंत्रज्ञानासोबत बदलणे अनिवार्य असले तरी सोशल मीडियाचा वापर करताना भाषेचा मूळ आशय, अभिव्यक्ती व गुणवत्तेकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

३. ब्लॉग्स, गुगल आणि विकिपीडियासारख्या प्रगत माध्यमांमुळे विविध विषयांवरील शास्त्रीय आणि तांत्रिक माहिती प्रमाण मराठी भाषेत लिखित स्वरूपात उपलब्ध होत आहे.

४. उद्याच्या संस्कृतीवर तंत्रज्ञानाचा अधिक प्रभाव दिसून येईल. आभासी ऑडिओबुक्स आणि इतर नव्या माध्यमांमुळे वाचन अधिक सुलभ आणि आकर्षक होईल. समाज माध्यमांमुळे वाचनाचे स्वरूप ‘मुद्रित’माध्यमांकडून ‘डिजिटल’ कडे बदलत आहे.

५. समाज माध्यमांचा मराठी बोली भाषा, लिखित भाषा, प्रमाण भाषा व वाचन संस्कृतीवर झालेला परिणाम अत्यंत व्यापक असून तो सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही बाजूंनी दिसून येतो.

६. सोशल मीडियामुळे मराठी, हिंदी, इंग्रजी मिश्रित भाषेचा वापर वाढला आहे.

**संदर्भ :**

१. भवारी हनुमंत, ‘प्रसारमाध्यमांसाठी लेखनकौशल्ये’, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे.

२. बोराटे योगेश, ‘सोशल मिडिया’, अथर्व पब्लिकेशन, जळगाव. २०१९.

३. शेकोकार रमेश, ‘दूरदर्शन आणि सामजिक परिवर्तन’, वैशाली प्रकाशन पुणे. २००५.

४. बोकील मिलिंद, ‘साहित्य, भाषा आणि समाज’, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०१६.

५. ठिगळे वेदश्री, ‘व्यावहारिक व उपयोजित मराठी’, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.२०२१.